आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२२ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

<u>ठळक बातम्या</u>

- तीन देशांचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मायदेशी परतण्यासाठी रवाना
- छत्तीसगड मधे सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत किमान १० माओवादी ठार
- महाराष्ट्र, झारखंड विधानसभा निवडणुका तसंच इतर राज्यातल्या पोटनिवडणुकांसाठीची मतमोजणी उद्या, निवडणूक आयोगाचं व्यापक नियोजन
- भारत आणि ऑस्ट्रेलिया बॉर्डर- गावसकर चषक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचा पहिला डाव अवघ्या १५० धावांवर समाप्त

<><><><>

तीन देशांचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परत यायला निघाले आहेत. गेल्या दशकभरात झालेला भारताचा प्रवास हा प्रमाण, गती आणि शाश्वततेचा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी काल गयानामध्ये भारतीय समुदायाला संबोधित करताना केलं. गयानात जॉर्जटाऊन इथल्या नॅशनल कल्चरल सेंटरमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. भारत लवकरच जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होणार असल्याचा पुनरुच्चार केला. तत्पूर्वी त्यांनी काल गयानाच्या संसदेच्या विशेष अधिवेशनालाही संबोधित केलं. समावेशक समाजाच्या उभारणीसाठी लोकशाहीपेक्षा अन्य कोणतंही मोठं साधन नाही. पुढे जायचं असेल तर लोकशाही प्रथम आणि मानवता प्रथम हाच मंत्र आहे, लोकशाही भारतीयांच्या डीएनएमध्येच आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री मोदींनी काल जॉर्जटाऊन इथं गयानाचे अध्यक्ष इरफान अली यांच्यासमवेत वेस्ट इंडिजच्या नामवंत क्रिकेटपटूंचीही भेट घेतली. नायजेरिया, ब्राझील आणि गयाना या तीन देशांचा यशस्वी दौरा आटोपून प्रधानमंत्री मायदेशी परत यायला निघाले आहेत.

<><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज लाओसमध्ये व्हिएन्तियान इथे जपानचे संरक्षण मंत्री जनरल निकातानी यांची भेट घेतली. निकातानी यांच्यासोबत या भेटीदरम्यान दोन्ही देशांमध्ये इंडो-पॅसिफिक प्रदेशातल्या मुक्त भागिदारीविषयी चर्चा झाल्याचं सिंह यांनी आपल्या समाज माध्यमावर म्हटलं आहे. त्यानंतर सिंग यांनी फिलिपीनचे संरक्षण सचिव गिल्बर्टो टिओडोरो यांचीही भेट घेतली. ॲक्ट ईस्ट धोरण आणि इंडो पॅसिफिक व्हिजन या योजनांमधला फिलीपीन हा महत्त्वाचा भागीदार आहे. त्यामुळे फिलीपीनसोबत संरक्षण सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन राजनाथ सिंह यांनी केलं.

<><><><>

भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी देशातल्या प्रत्येक नागरिकानं राष्ट्र प्रथम हा दृष्टिकोन स्वीकारणं गरजेचं आहे, यावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भर दिला. त्या आज हैद्राबाद इथं लोक मंथन कार्यक्रमाच्या चौथ्या आवृत्तीत बोलत होत्या. राष्ट्रपतींनी यावेळी आंतरराष्ट्रीय कला महोत्सवाचं औपचारिक उदघाटन केलं. देशात विविधता असली तरीही

एकता अबाधित राखण्यासाठी भारताची संस्कृती, भाषा, परंपरा आणि ज्ञान यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे, असंही त्या म्हणाल्या.

<><><><>

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होणार आहे. मतमोजणीची सुरुवात टपाली मतांच्या मोजणीपासून होईल आणि त्यानंतर साधारण साडेआठ वाजल्यापासून ईव्हीएमवरच्या मतांची मोजणी सुरू होईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कलिंगम यांनी दिली आहे. २८८ विधानसभा मतदारसंघांमधल्या मतमोजणीसाठी तितकीच मोजणी केंद्रं काम करणार आहेत, शिवाय नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी एक मोजणी केंद्र स्थापन करण्यात आलं आहे. या प्रक्रियेसाठी सुमारे ६ हजार ६०० पथकं नियुक्त करण्यात आली आहेत. मतमोजणी केंद्रांवर केंद्रीय पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल आणि स्थानिक पोलिसांच्या कड्यांची त्रिस्तरीय सुरक्षाव्यवस्था तैनात करण्यात आली आहे. मतमोजणीच्या प्रक्रियेवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर असणार आहे. दुपारी बाराच्या सुमाराला पहिले निकाल हातात येतील, मात्र मतदारसंघाच्या आकारमानानुसार यात फरक पडू शकतो. संध्याकाळी निकालाचं पूर्ण चित्र स्पष्ट होईल, असंही एस. चोक्कलिंगम यांनी नमूद केलं आहे.

<><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या ८१ जागांसाठी तसंच आसाम, बिहार, छत्तीसगढ, गुजरात, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, मेघालय, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पश्चिम बंगाल या राज्यांतल्या विधानसभा आणि केरळच्या वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीची मतमोजणीदेखील उद्याच होणार आहे. झारखंडमध्ये २४ मतमोजणी केंद्रं उभारली असून उद्या सकाळी टपाली मतांच्या मोजणीला सुरुवात होईल, असं झारखंडचे मुख्य निवडणूक अधिकारी के रवी कुमार यांनी सांगितलं.

<><><><>

काँग्रेसने मणिपूरमधल्या संवेदनशील परिस्थितीला जाणीवपर्वक खतपाणी घातल्याचा आरोप भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा यांनी केला आहे. मणिपूर हिंसाचारासंदर्भात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना लिहिलेल्या पत्राला नड्डा यांनी उत्तर दिलं आहे. मणिपूरमधली शांतता भंग करण्यासाठी कट्टरतावादी संघटना सातत्यानं प्रयत्न करत राहतात, हे काँग्रेसच्या प्रशासनाचं अपयश आहे, अशी टीका नड्डा यांनी आपल्या पत्रात केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे गेल्या दहा वर्षांत ईशान्य भारतात अर्थव्यवस्था, सुरक्षा, आरोग्य सेवा, शिक्षण अशा क्षेत्रांमध्ये परिवर्तन झालं असून आता तिथे विकासाच्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत, असंही नड्डा यांनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.

<><><><>

छत्तीसगड मधे सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत आज किमान १० माओवादी ठार झाले. सुकमा जिल्ह्यातल्या कोंटा परिसरात माओवादी अतिरेकी दडून बसले असल्याची खबर मिळाल्यावरुन केंद्रीय राखीव पोलीस दल आणि जिल्हा राखीव सुरक्षा दलानं संयुक्त शोधमोहीम सुरु केली होती. त्या दरम्यान भेज्जी परिसरात झालेल्या गोळीबारात हे अतिरेकी मारले गेले. सुरक्षा दलांनी १० जणांचे मृतदेह शोधले असून त्यांच्याजवळून एके -47 सह मोठ्याप्रमाणात शस्त्रास्त्र आणि दारुगोळा जप्त करण्यात आला आहे. सुरक्षादलांची मोहीम अद्याप सुरु आहे. मार्च २०२६ पर्यंत देशातून कडव्या डाव्या विचारसरणीचा बीमोड करण्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गेल्या ऑगस्ट मधे केली होती. त्यानुसार जानेवारी २०२४ पासून आतापर्यंत केलेल्या विविध मोहिमांमधे २५७ नक्षली अतिरेकी मारले गेले तर ८६१ पकडले गेले. सुमारे ८०० नक्षली शरणागती पत्करुन मुख्य प्रवाहात सामील झाले.

<><><><>

आयसीसी अर्थात आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांच्यासह अनेक इस्रायली नेत्यांच्या अटकेसाठी काढलेल्या वॉरंटचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी निषेध केला आहे. इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनीही आयसीसीच्या निर्णयाचा निषेध केला असून आपल्यावर जाणीवपूर्वक खोटा आरोप केल्याचं म्हटलं आहे. आयसीसीने केलेले आरोप इस्रायल आणि हमास या दोघांनीही फेटाळून लावले असले तरी फ्रान्स आणि नॉर्वे या देशांनी मात्र आयसीसीच्या कारवाईचं समर्थन केलं आहे.

**<><><><>**

२०२२ आणि २०२३ या वर्षांसाठीचे उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार आज केंद्रिय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील. नवी दिल्लीत होणाऱ्या या समारंभात ८२ युवा कलाकारांना सन्मानित केलं जाईल. २००६ मध्ये संगीत नाटक अकादमीनं युवा कलाकारांसाठी हे पुरस्कार सुरू केले. संगीत, नृत्य, नाट्य, लोककला, आदिवासी कला आणि कठपुतळी नृत्य क्षेत्रातल्या युवा कलाकारांना दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात.

**<><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया बॉर्डर- गावसकर चषक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचा पहिला डाव अवघ्या १५० धावांवर समाप्त झाला. ऑस्ट्रेलियात पर्थ इथल्या ऑप्टस मैदानावर सामन्याला आज सकाळी सुरुवात झाली. भारतानं नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र भारतीय फलंदाजांनी सपशेल निराशा केल्यानं भारताचा डाव १५० धावांत आटोपला. के एल राहुल, ध्रुव जुरेल, ऋषभ पंत, नितीश कुमार रेड्डी यांचा अपवाद वगळता एकही फलंदाज मैदानावर फार काळ टिकू शकला नाही. ऑस्ट्रेलियाचा डाव सुरू झाला असून त्यांच्या १ बाद १४ धावा झाल्या आहेत.

**<><><><>**

अझरबैजानची राजधानी बाकू इथं सुरू असलेल्या संयुक्त राष्ट्राच्या कॉप २९ परिषदेत जलवायू संदर्भात पुरेशा आर्थिक तरतुदींऐवजी त्यावरील उपाय योजनांवर भर दिल्यानं भारतानं निराशा व्यक्त केली.

**//<><><><>//**